राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत आयईडीएसएस या योजनेसाठी राज्य हिस्सा रु.९८.५३ लक्ष इतका निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरएमएसएस २०१८/(४१/१८)/एस.डी.६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा -

१) विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २४१७/(४६/१७)/अर्थसंकल्प, दि.१०.८.२०१७.
२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.६.२०१७.
४) मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. ११ डिसेंबर, २०१७ चे पत्र.
५) विभागाचा शासन निर्णय क्रमांकःआरएमएसएस २०१६/(६८/१६)/एसडी-६, दि. २३ मार्च, २०१७.

प्रस्तावना-

अपंग समावेशित शिक्षण माध्यमिक स्तर (IEDSS) हा उपक्रम केंद्र शासनाच्या दि. २१ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयाद्वारे राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. सदर योजना ही माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विशेष गरजा असणा-या विद्यार्थ्यांशी निगडीत आहे. या योजनेअंतर्गत १४ ते १८ वयोगटातील सर्व अपंग विद्यार्थ्यांना इयत्ता ९वी ते १२वी पर्यंत शैक्षणिक सहाय्यभूत व संदर्भ सेवा, अडथळा विरहित वातावरण निर्मिती व इतर अनुषंगिक सहाय्यता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे देण्यात येत आहेत. इयत्ता ९ वी ते १२ वी तील माध्यमिक स्तरावरील अपंग विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाने २००९ मध्ये सुरु केलेली अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) (आयईडीएसएस) ही केंद्र पुरस्कृत योजना असून, या योजनेचे स्वरुप केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे आहे. केंद्र शासनाच्या दि. ०६.०५.२०१६ च्या आदेशान्वये, सदर योजनेसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला रू. १४७.३८ लक्ष इतका निधी दि. २३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे. या योजनेकरीता केंद्र शासनाकडून वितरित करण्यात आलेल्या सदर निधीच्या प्रमाणात राज्य शासनाचा देय हिस्सा रु.९८.५३ लक्ष इतका निधी अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) या योजनेसाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत अपंग समावेशित शिक्षण योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये प्रभावीपणे होण्याकरीता सन २०१७-१८ मध्ये राज्य हिस्सा रु. ९८.५३ लक्ष (अक्षरी रूपये

अठ्ठयान्नव लक्ष त्रेपन्न हजार फक्त) निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी आयईडीएसएस योजनेतील अपंग मुलांसाठी आवश्यक आवर्ती उपक्रमांकरिता खर्च करण्यात यावा.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र. ई-३, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाज कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०४, (००) (०४) माध्यमिक स्तरावरील अपंगाकरीता एकात्मिक शिक्षण (आयईडीएसएस) (राज्य हिस्सा) (२२३५ बी८९१) ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीतून रु. ९८.५३ लक्ष इतका निधी वितरित करण्यात यावा.

वरील खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८.४.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी, तसेच अवर सचिव/कार्यासन अधिकारी(रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. १८.४.२०१७ व दि. ३०.६.२०१७ च्या परिपत्रकास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या दि. १८.४.२०१७ च्या परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर रु. ९८.५३ लक्ष निधी वितरित करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३६७/व्यय-५, दिनांक २७.०३.२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११६१२१७८८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d62013750a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2018.03.31 21:11:39 +05'30'

(सु. ब. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, (विधान सभा/ विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
४. सर्व मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.
६. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
८. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.
९. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे.

१०.सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
१३.संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
१४. वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद(सर्व)
१८.वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
१९.कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.निवड नस्ती, एसडी-६.